# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित (तृतीय क्रमांक विजेती कविता)
- कवी / कवयित्रीचे नाव :- अमित गोखले

खर्ज मंद्र तार सप्त या उरी तरंगती
माणसेच छंद बद्‌ध बंधनात बंधती,

तिव्र शुद्‌ध कोमलात भाव होत व्यक्त तो,
राग पाष त्या स्वरात गुंफताच रंगती,

हर्ष, दुःख, राग, लोभ, मत्सरास दावती,
शब्द जे पुढ्यात येत तेच घेत संगती,

भक्ति गीत, भाव गीत, जीव त्यात ओतुनी,
शास्त्र शुद्‌ध, मंत्र मुग्ध, स्पष्ट भाव वंदती,

तान, ताल, सूर, शब्द, वाद्‌यवृंद मेळ तो,
गायनात, ऐकण्यात, एक जात दंगती,

भेद-भाव, दोष, रोग, होत अस्त जीवनी,
सूर ताल, नित्य नित्य, अंतरात गंधती.

Anahat Music Therapy